# मिरा भाईंदर महानगरपालिका
## उदयान विभाग

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

जा.क्र.मनपा/उद्यान / 655 /2023-24 दिनांक :-29 /02/2024

## // जाहिर नोटीस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम 1975 च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या कलम 8(3) अन्वये या नोटीसव्दारे असे जाहिर करण्यात येत की मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकासकामात बाधीत होणारी/धोकादायक झाडे मुळासहित काढणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | प्रसन्न पार्क सोसायटी, मनीष अपार्टमेंटच्या मागे, सिध्दीविनायक हॉस्पीटल लेन, नवघर रोड, भाईंदर (पू.) | 01 नग नारळ<br>01 नग जांभूळ | सदरच्या झाडांची मुळे पिण्याच्या पाण्याच्या टाकीच्या आत गेल्यान पाण्याच्या टाकीला तडे गेलेले आहे. तसेच सदरची झाडे धोकादायकरित्या वाकलेले आहेत. |
| 2 | हिंगलाज को.ऑ.हौ.सो.लि., विनायक नगर रोड, भाईंदर (प.) | 01 नग नारळ | सदरच्या झाडाची मुळ संरक्षण भिंतीच्या व सेप्टीक टॅकच्या आत गेल्याने संरक्षण भिंतीला व सेप्टीक टॅकला तडे गेलेले आहेत. |
| 3 | तिरुपती दर्शन, बालाजी नगर भाईंदर (प.) | 01 नग रेन्ट्री | सदरचे झाड उंच वाढलेले असुन सदरचे झाड धोकादायकरित्या वाकलेले आहे. सदर ठिकाणी पाणीपुरवठा विभागामार्फत पाईपलाईन टाकण्याचे काम सुरु असुन खोदकाम करतेवेळी झाड पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून 7 दिवसाच्या आत लेखी स्वरूपात उप-आयुक्त (उदयान), उदयान व वृक्ष प्राधिकरण विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे व mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदती नंतर प्राप्त होणाऱ्या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही. तसेच सदरची सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

28.2.24

(कांचन गायकवाड)
सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner